# प्रकरण दुसरे

## प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील आशयसूत्रे

## प्रकरण दुसरे

### प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील आशयसूत्रे

या आधीच्या प्रकरणात आपण ग्रामीण कथेचे स्वरुप आणि विकास पाहिला आणि इ.स. १९७०-८० दशकातील ग्रामीण कथेचा विचार करता ती बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी आणि समकालीन ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारी दिसून येते. ग्रामीण कथालेखनामध्ये कथालेखिकेची उणिव भासत होती. म्हणून ही उणिव काही प्रमाणात भरुन काढण्याचे काम प्रामुख्याने विदर्भातील प्रथितयश ग्रामीण कथालेखिका प्रतिमा इंगोले यांनी केलेले आहे. वैदर्भी बोलीत आपल्या कथा लिहून ग्रामीण कथेला एक नवा आयाम देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

म्हणूनच त्यांच्या कथालेखनाचे विशेष पाहत असताना त्यांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण कोणकोणत्या अंगांनी केलेले आहे हे प्रथमत: लक्षात घेता त्यानुसार त्यांच्या कथेतील आशयाचे चित्रण क्षेत्र किती व्यापक आहे ? त्यामध्ये कोणत्या प्रकारची विविधता आढळते या विविधतेतून त्यांच्या कथालेखनाचे कोणकोणते विशेष आढळतात ते प्रामुख्याने या प्रकरणात पहावयाचे आहे. प्रतिमा इंगोले यांची कथा वास्तववादी असून ग्रामीण जीवनातील दु:ख हे त्यांच्या कथालेखनाचे आस्थाकेंद्र असलेले दिसून येते. त्याचबरोबर ग्रामीण समाज आणि व्यक्ती त्यांच्या परस्पर सुखदु:खाची सांगड त्या आपल्या कथांमधून मांडताना दिसतात. त्याचप्रमाणे ग्रामीण संस्कृतीशी असलेला घनिष्ट संबंध याचा त्या आपल्या कथेत शोध घेतात आणि विशेष म्हणजे

केवळ स्त्रीवादी भुमिकेतून त्या स्त्रियांची दु:खे मांडत नाहीत तर, एकंदर सामाजिक परिस्थिती, दारिद्र्य यामुळे तिला भोगाव्या लागणा-या दु:खाचे चित्रण त्या करताना दिसतात. त्यांच्या कथा लेखनामागील प्रेरणा व भूमिका समजावून घेऊन वाङ्मयीन परिचय करुन घेऊ.

मराठी साहित्याला १९६० च्या आसपास दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य असे दोन साहित्य प्रवाह येऊन मिळाले. या दोन्ही साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्याला अधिक विस्तृत व सखोल बनविले. हे नि:संशय खरे असले तरी कालपर्यंत बेगडी व पोझ घेतल्यासारखे वाटणारे हे ग्रामीण साहित्य कसदार बनविण्याचे काम काही प्रमुख लेखकांनी केलेले आहे. असे कसदार आणि दर्जेदार लेखन करणा-या लेखकाच्या यादीमध्ये व-हाडी कथालेखिका म्हणून व-हाडप्रांतामध्ये इतकेच नव्हे तर ग्रामीण कथाकारांच्या मध्ये प्रतिमा इंगोले या लेखिकेचे नाव निश्चित समाविष्ट करावे लागते.

अशा या दर्जेदार व कसदार कथालेखन करणा-या प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनामागील भूमिकांचा व प्रेरणांचा विचार करु.

<u>प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनामागील भूमिका आणि प्रेरणा :</u>

गेल्या दशकामध्ये म्हणजे १९७०-८० च्या कालावधीत सातत्याने कथा लेखन करणा-या कथालेखिका प्रतिमा इंगोले या व-हाड प्रांतामधल्या एक जेष्ठ कथालेखिका म्हणून ओळखल्या जातात. इतकेच नव्हे तर व-हाडी कथांची भरघोस पीक घेणारी आणि

आपल्या कथांना भाव मिळवून देणारी एक सामर्थशाली वैदर्भीय लेखिका म्हणून त्यांना ओळखले जाते. आपल्या कथालेखनाबद्दल त्या सांगतात, "लहानपणी मला कहाण्या खूप आवडायच्या, आईला सारखी कहाणी सांग म्हणायची, आईला भीती वाटायची ती म्हणायची "कहाणीचा छंद बरा नाही." तेव्हा ऐकाविशी वाटणारी कहाणी आज लिहावीशी किंवा ऐकावीशी वाटते. लहानपणी मी खूप कहाण्या ऐकल्यानंतर शाळा कॉलिजात खूप कहाण्या वाचल्या...." पुढे त्या म्हणतात, "माझ्या घरात माझे वडील वारले आणि आईची एक कहाणी झाली. आजोबा कवी होते. पुरोगामी विचारसरणीचे देशभक्त होते. पण हाडाचे शिक्षक होते. त्या काळात त्यांनी खेडोपाडीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्वखर्चाने मोफत वसतिगृह व व्यायाम हयात गाव आघाडीवर आणला. आपल्या मानसपुत्रास गढावरील राहते घर राहावयास दिले. हे मानसपुत्र दलित असून त्यांना विहीरही खुली करुन दिली. पण गावातील धजदांडग्यांनी त्यांचा व त्यांच्या कृतिशील विचारांचा पद्धतशीरपणे पराभव केला. एका कहाणीचा इथे जन्म झाला." [१]

यावरून प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनामागील पार्श्वभूमी लक्षात येते. तसेच त्या आपण कथालेखनाला कसे प्रवृत्त झालो या विषयी एके ठिकाणी म्हणतात, "नागपूर तरुण भारतचे "झंली उलार झाली" नावाचे ग्रामीण कथेचे सदर सुरु केले होते. हया कथा मी वाचू लागले कारण त्या कथा मला वास्तव वाटायच्या त्यात विदर्भातील जीवन प्रतिबिंबीत व्हायचे. या कथा वाचता, वाचता जाणवू लागले की, आपल्या मनातील अशा कितीतरी कथा आहेत पण त्या छापणार कोण. पेपर खूप मोठा वाटायचा. लेखक कुणीतरी प्रतिभावंत वा

मोठा माणूस वाटायचा. आजोबा कवी होते. त्यांनी भाषा व्याकरण शिकविले. एम्.ए.चा अभ्यास करतानाच साहित्याची गोडी लागली. आपोआप कथा व कविता आपली वाटू लागली. खूप लहानावर झालो तेव्हा एक छोटी कथा लिहून टाकली आणि ती कथा नागपूरच्या तरुणभारत मध्ये प्रसिध्द झाली... त्या मध्यमा पुरवणीचे संपादक प्रभाकर सिरास यांनी त्या कथेविषयी लिहिले की, "तुमच्या कथेत तरल निरागस मृदु असा विनोदाचा धागा आहे. तो तुम्ही जपायला हवा. तुम्ही छान लिहू शकता." [२] यावरुन नागपूरच्या तरुण भारत मधील छापून आलेल्या कथेपासून आणि साहित्याच्या व्यासंगामुळे आणि घरातील आजोबांचा कवी म्हणून असलेला वारसा हाच लेखिकेला लेखनासाठी प्रेरणा देणारा एक महत्वाचा धागा आहे, असे दिसून येते. आणि त्यामुळेच त्यांच्या हातून पुढे मोठया उमेदीने कथालेखन झालेले दिसून येते. आज त्यांच्या नांवावर सात कथासंग्रह, दोन कवितासंग्रह, एक कादंबरी, बालवाङ्.मय आणि समीक्षात्मक, संशोधनात्मक लेखण ऐवढी समृध्द वाङ्.मय संपदा आढळते. अशा प्रकारे महाराष्ट्रातील एक प्रतिभावंत ग्रामीण लेखिका म्हणून प्रतिमा इंगोले यांचा उल्लेख करता येईल.

प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनामागील भूमिकेचा आणि प्रेरणांचा विचार केल्यानंतर त्यांच्या वाङ्.मयीन कर्तृत्वाचा आता परिचय करुन घेऊ.

## वाङ्.मयीन कर्तृत्व :

"हजारी बेलपान" हा पहिला ग्रामीण कथासंग्रह प्रसिध्द होऊन कथालेखिका म्हणून ओळखल्या गेल्यानंतर, "अकसिदीचे दाने", "मुारनचा खोपा", "लेक भुईची", "जावयाचं पोर", हिरवे स्वप्न, इत्यादी कथा-

संग्रह प्रसिध्द आहेत. "भुलाई" ग्रामीण कविता संग्रह व "बुराई" ही ग्रामीण कादंबरी प्रसिध्द झाली व अनेक बालवाङ्.मय प्रकाशित झाले आहेत.

कथा, कविता, कादंबरी, बालवाङ्.मये आणि संपादने इ. प्रकारची त्यांची साहित्य संपदा आहे. याचबरोबर विविध सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यात त्या हिरीरीने सहभागी होताना दिसतात. तसेच त्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात त्या मानाच्या पदा-वर काम करतानाही दिसतात.

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कथांमधून ग्रामीण स्त्रीला भोगाव्या लागणा-या दुःखाचे वेगवेगळे पदर उलगडून दाखविले आहेत. कारण स्त्रिचे दुःख हा त्यांच्या आस्थेचा विषय असलेला दिसून येतो. विदर्भातील ग्रामीण स्त्री च्या वाटयाला आलेली नानाविध दुःखे त्या आपल्या कथांतून चित्रित करतात. हे दुःख चित्रित करीत असताना स्त्री म्हणून तिची बाजू न घेता जीवनाचा एक भाग म्हणून तिला भोगाव्या लागणा-या व्यथा प्रामुख्याने मांडल्या आहेत. ग्रामीण स्त्रीवर आजही कसा अन्याय अत्याचार केला जातो आहे आणि त्यामुळे तिला कोणकोणत्या प्रकारचे दुःख सोसले लागते आहे हेही त्यांनी आपल्या कथांतून सांगितले आहे. त्यांच्या कथा ह्या व-हाडी जीवनाशी निगडित असलेल्या दिसून येतात. तसेच व-हाडी लोकजीवन संस्कृती व अस्मिता यावर प्रकाश टाकणा-या अशाच त्यांच्या कथा आहेत. माणूस म्हटल्यावर दुःख हे अपरिहार्य आहे. परंतु स्त्रीच्या वाटयाला आलेली दुःखे ही समाजव्यवस्था आणि तिचा दर्जा यावरही अवलंबून असतात. अशाप्रकारे ग्रामीण स्त्री जीवनाचे वास्तववादी चित्रण प्रतिमा इंगोले यांनी कोणकोणत्या अंगांनी केलेले आहे आणि स्त्रीला भोगावे लागणारे दुःख नेमके कोणत्या स्वरूपाचे होते ? हे आता आपण त्यांच्या प्रत्यक्ष कथांवरून लक्षात घेऊ.

एकत्र कुटुंबपद्दतीमुळे भोगावे लागणारे दु:ख :

आजही ग्रामीण भागात ब-याच ठिकाणी एकत्र कुटुंबपद्दती असलेली आढळून येते. आणि या एकत्र कुटुंबपद्दतीत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान मिळत असते. परंपरेप्रमाणे कुटुंबातील चूल-मूल सांभाळत जेवणखाण, उष्टीखरकटी तर काढावीच लागतात आणि पुरुषांच्या बरोबरीने तिला शेतातील काम करावे लागते असे काबाडकष्ट करण्यात तिचे आयुष्य जाते. अन् एवढे करुनही तिला सुखाचा असा एकही शब्द ऐकायला मिळत नाही. एवढेच नव्हे तर या एकत्र कुटुंबात श्रीमंताच्या घराण्यातून आलेल्या सुनेला अधिक मान तर गरीब घरातून आलेल्या सुनेला मान कमी असे मानापमानाचे जिणे तिला जगावे लागते. एकत्र कुटुंब पद्दतीमुळे हे ग्रामीण भागातील वास्तव आणि या परिस्थितीमुळे स्त्रियांना भोगावे लागणारे दु:ख यांचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी आपल्या कांही कथांतून केलेले आहे. अशा कथांचा आपण आता विचार करु. "पैरायाची लेक" (लेक भुईची) या कथेत समाजव्यवस्थेमुळे आणि एकत्र कुटुंबपद्दतीमुळे केसरला भोगाव्या लागणा-या दु:खाचे चित्रण या कथेत केलेले आहे. लाडात वाढलेली एकुलती एक असलेली केसर लहानपणा-पासून होती. साहजिकच मुलीचं भविष्य उज्वल व्हावे यासाठी तिच्या आईवडिलांनी श्रीमंत घर पाहून तिचं लग्न केलं आणि तेही मागतील तेवढा हुंडा देऊन. लग्नानंतरच्या जीवनाने तिची झालेली अवस्था इंगोलेनी अचुक टिपली आहे. गरीब म्हणून तिच्यावर शिक्का बसतो आणि एखाद्या मोलकरणीवाणी जगणं आपल्याला भोगावं लागत आहे याची जाणिव केसरला होते आणि ती दु:खाने कोलमडून जाते. अशाही परिस्थितीत ती आपले जीवन जगत असते. आणि आपल्या माहेरची खुशाली ऐकण्यासाठी ती आपल्या चुलत बहिणीकडे जाते. चुलत

बहिणाीने तिच्या आईचे दु:ख या प्रसंगातून सांगितले आहे.[१] "काय म्हनीन ! काकूनं वाट पायली बयना। निमाले येतीन म्हनून । हया पिसं घिवून ठेवले. कोस्टयाजोळून चोया घिवून ढिवल्या. तिले वाटलं माया बाईच्या यठी पयल्यानं जाईन न यिले चोयी घालीन तिले. चोली घालीन तिच्या ननदाईले पीस दिन, व-हाळनीलो पीसं दिन. ययी आनाले तिनं डबाईत करून ठिवला व्हता कानोले केलते, लाल केलते, अनारसे केलते. मलेच दैले खायाले, केले आन आता कोनी खातई नायी. त्याईले तुमीच याद येते व्ळोव्ळो वाटते बाईच्यामधी गेली असती त तिनं खाल्ले असते माया।[२] या प्रसंगाने केसरच्या आईची केसरला भेटण्याची आतुरता या प्रसंगातूनच दिसून येते. केसरच्या कुटुंबात केसरला कोणीही सन्मानाने वागवत नाहीच त्याचप्रमाणे केसरच्या माहेराच्या माणसांनाही कोणी सन्मानाने लग्नकार्यात वाणाले नाही.

एकत्र कुटुंबातील इतर सुनेपेक्षा केसरची घरची परिस्थिती जरा कमीच होती. यामुळे तिला या कुटुंबात जे दु:ख भोगावे लागते त्या दु:खाची जाणीव अनेक प्रसंगातून होत असते. घरातील मोठया सुनेला काहीही काम लावले जात नाही. कारण ती मोठया घनिक घराण्याची त्यामुळे तिला घरात काहीही काम लावत नाहीत. उलट तिच्या माहेरच्या लोकानाही मान सन्मानाने वागविले जाते. याचे चित्रण केलेले आहे. एकत्र कुटुंबात कुचंबलेपणाचे दु:ख भोगावे लागते ते केसरसारख्या स्त्रियांना आणि या प्रसंगामुळे केसरच्या मनाची झालेली अवस्था पाहण्यासारखी आहे. ती मनाला चटका लावून जाते. परंतु आपल्या अपमानापेक्षा आणि वागणुकीपेक्षा आपल्या आईवडिलांना मिळालेल्या वागणुकीने केसरच्या दु:खाला पारावार राहत नाही. आपल्याला मिळालेला जीवनाचा हा मार्ग निमुटपणे जगला पाहिजे

ही जाणीव तिच्या अंतर्मनात रुजली आहे.

"लोकावानी" (अकसीदीचे दाणे) या कथेमध्ये घरातील सुनेला सर्व बाजूने दिलेले दुःख आणि या दुःखातही एखादा आशेचा किरण मिळेल या अपेक्षेपोटी जगणारी ग्रामीण स्त्री चित्रित केली आहे. मुल होत नाही म्हणून नव-याबरोबर घरातील इतर लोकही तिला त्रास देत असतात. हा त्रास तिच्या गरोदरपणातही कमी होत नाही. एवढेच नाहीतर तिला मायेचा ओलावाही मिळत नाही. एखाद्या जनावाराप्रमाणे कुटुंबासाठी सतत राबणे एवढीच तिच्याकडून अपेक्षा असते. ग्रामीण कुटुंबातील विशेषत: एकत्र कुटुंबात सुनेला(स्त्री) दोष देणे यात काही गैर नाही. सर्रास तिलाच दोष ठरवितात हे या कथेत चित्रित केले आहे. शाळेच्या भितीपोटी दीर घरातून पळून जातो आणि दडून बसतो या एकमेव घटनेला तिलाच जबाबदार धरुन तिचा नवरा कसा बेदम मारतो याचे ह्रदयद्रावक चित्रण केलेले आहे. ग्रामीण स्त्री जीवनातील या प्रसंगाचे चित्रण इंगोले यांनी वास्तव स्वरुपात टिपलेले आहे. पत्नीला मारणे हाच जणु पुरुषार्थ समजला जातो आणि गरोदर पत्नीला कणसं बदलल्यासारखे मारणे या प्रसंगावरुन स्त्रीचा गुदमरलेपणा चित्रित केलेला आहे. हा या कथेतील पुढील प्रसंगच सर्व काही सांगून जातो. दिवसभराच्या कामाने ही सून अगदी मेटाकुटीला आलेली असते. त्यातच संध्याकाळी नवरा शेतातून आल्यावर नणंदेने तिची तक्रार सांगितली.

"भाऊ ! भगोताचा सकाऊनपासून वरता नायी रे ! हे वयनीच त्याले काल बोलली व्हती. सा-या दिसभर आमी कायजीत हावो !

तिचा जीवन आनखीनच लटलटू लागला. ननदनं सिदं तिचंच नांव घेतलं व्हत. तितल्याच सासराई आला. त्यालेई देर कुठीसाच

दिसता नोता. ननद आता आखीनच जोर जोरानं उस्मारे टाकू लागली. तसा बुवा उठला आनं त्यानं कोप-यातं पुरानं उचललं" [४]

या प्रसंगातून तिला कुटुंबात साळीकडून दोष ठरवून नवरा कसा बेदम मारतो याचे चित्रण केलेले आहे. या कुचंबलेपणाविषयी वासुदेव मुलाटे म्हणतात, "गणेश आवटे यांच्या "कागुद" या कथासंग्रहात अशा गुदमरणा-या ग्रामीण स्त्री-मनाचे चित्रण प्रकर्षाने येते. ग्रामीण स्त्री मनाचे असेच कुचंबलेपण प्रतिमा इंगोले यांच्या कथेतूनही प्रामुख्याने येते." [५] वासुदेव मुलाटे यांचे हे मत योग्य वाटते. ग्रामीण स्त्रीला चारीबाजूने कसे दुःख दिले जाते आणि यात स्वतःची काहीही चूक नसताना या कुटुंबव्यवस्थेत दुःख तिच्या वाट्याला येते हे प्रत्ययकारीपणे दाखविले आहे.

## हुंडा पद्धतीमुळे स्त्रियांना भोगावे लागणारे दुःख :

एकत्र कुटुंबपद्धतीत स्त्रियांना जसे दुःख भोगावे लागते त्याच बरोबर ग्रामीण भागात हुंड्यांच्या अवास्तव मागणीमुळेही स्त्रियांना दुःखे कशी भोगावी लागतात आणि या स्त्रियांच्या बरोबरच त्यांच्या आई-वडिलांचेही कसे जीवन उद्ध्वस्त होते, घरचे दारिद्र्य आणि त्यात मुलींना द्याव्या लागणा-या हुंड्यापायी अनेक मुलींना अविवाहीत कसे राहवे लागते, किंवा प्रसंगी तिस-या लग्नाला उभा राहिलेल्या नव-याबरोबर लग्नास तयार व्हावे लागते. यामुळे ग्रामीण भागात हुंड्याच्या अनिष्ट प्रथेचे अनेक स्त्रिया कशा बळी पडतात याचे चित्रण प्रतिमा इंगोले आपल्या कथेतून करतात.

"डुबतीची पावलं" (लेक भुईची), ही कथा काळजाला स्पर्श करणारी आहे. या कथेत वडील लग्न करून देऊ शकत नाही. म्हणून सीतामाय जलमय होते. या आत्मसमर्पणास जबाबदार कोण ? शासन समाज, निसर्ग व पित्याची असहाय्यता. हे किती सामर्थ्याने त्यांनी या कथेत मांडले आहे. या कथेत जनकरावांला दारिद्रयी परिस्थिती-मुळे हुंडा देण्याची कुवत नसते आणि येणाऱ्या पिकावर अवलंबून राहून शेवटी मुलींचं लग्न होत नाही. यामुळे जनकराव आणि तिची मुलगी यांना होणाऱ्या दुःखाचे चित्रण या कथेत केलेले आहे.

पैशाच्या चणाचणीमुळे आणि पिकाच्या उत्पन्नापोटी अवेळी मिळणारे पैसे यामुळे मुलीचे ठरलेले लग्न मोडते आणि अखेरीस जमिनीचा तुकडा सावकाराच्या घशात जातो. याचा परिणाम तिच्या मुलीच्या आत्महत्तेत होतो. ग्रामीण भागातील बेभरवशाची शेती आणि त्या उत्पन्नावर आधारित असलेले मुलीचे जीवन हे दाखविले आहे. मुली-च्या लग्नासाठी हुंडा द्यावा लागणार यासाठी कापसासारखी नगदी पिके काढली जातात व याच पिकामुळे शेतकरी कसा अडचणीत येतो आणि त्याच्या कुटुंबाला दुःख कसे सहन करावे लागते याचे वास्तव चित्रण प्रतिमा इंगोले यांनी या कथेत घडविले आहे.

"पयस्याची मेख" (लेक भुईची) या कथेत संपत शिंपी दारिद्र्या-मुळे तो आपल्या मुलीचं लग्न करु शकत नाही. कारण मुलीच्या लग्ना-साठी द्यावा लागणारा हुंडा त्याच्याजवळ नव्हता. आर्थिक परिस्थिती बेताची त्यात शिंपी धंदाही व्यवस्थित चालत नाही. अशा परि-स्थितीने मेटाकुटीला आलेला संपत शिंपी आपल्या मुलीच्या लग्नासाठी बरेच प्रयत्न करतो. परंतु पैशाअभावी तो लग्न करू शकत नाही. परंतु केवळ हुंडा मागत नाही म्हणून तिसऱ्यांदा लग्नाला तयार झालेल्या आणि मुलीच्या वयाच्या दुप्पट वय असलेला नवरा तिला

पसंत करावा लागतो. यामागची कारण मीमांसाही त्या प्रकारची आहे. घरची गरिबी आणि वाढत चाललेले वय यामुळे सामाजिक दबावाला घाबरून लग्नाला तयार झालेला संपत शिंपी याची मुलगी याचे चित्रण म्हणजे समाज जीवनातील चालत आलेल्या कमजोरीचे कारण आहे. हुंड्यासाठी मुलींच्या जीवनाची झालेली वाताहत आणि त्याचबरोबर कुटुंबाची झालेली अवस्था प्रतिमा इंगोलेंनी या कथेत अचूक टिपली आहे. संपत शिप्याच्या मुलीचा आणि तिच्या पत्नीच्या मनाचा कसा कोंडमारा होतो आणि ग्रामीण भागातील हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेमुळे कित्येक मुलींचे आयुष्य कसे उध्वस्त होते याचे वास्तव चित्रण येते. "सोन्याचा गोफ" (अकसिदीचे दाने) या कथेत हुंड्यासारख्या अनिष्ट प्रथेमुळे स्त्रीला दुःख भोगावे लागते. मुलीच्या हुंड्यासाठी कर्ज काढणे त्यासाठी अपरिहार्य ठरते. त्याचबरोबर हुंडा देऊनही घरातील वडीलोपार्जित आठवण म्हणून ठेवलेली वस्तूही मागितली जाते आणि ती दिली नाही तर किती आकांत केला जातो याचे उत्तम उदाहरण म्हणून ही कथा सांगता येईल.

हुंडा देऊनही प्रश्न सुटतो अशातला प्रश्न नाही तर तो अधिकच गंभीर होतो याचे चित्रण "सोन्याचा गोफ" या कथेमध्ये हुंड्यासाठी आर्थिक परिस्थिती नसताना आपल्या मुलीच्या लग्नासाठी घरातील मोल्यवान वस्तूही हुंडा देताना दिसतात, "आवो! इकू नका तो गोफ...। पन शेठजीजोळ गहान न ठेवा । तितलेच चार पैसे येतीन न दिवसातरमा निभतीन ? आन मंग हंगामावर सोडून आना ।" बापू म्हणात, "अव । तुले कसं कयत नाही ? एकडाव का शेडजीले मायाजोड गोफ आहे ! अस मालुम झालं, का रायते का तो ? आता मीच शेठजीच्या इकडे गहान हावो ! हे काय कमी होय ?" या वरून त्यांची परिस्थिती लक्षात येते. [६] सोन्याचा गोफ गहान न ठेवताही

ते कर्ज काढून मुलीचं लग्न करतात. परंतु लग्नात मुलगा त्या गोफासाठी रुसून बसतो आणि मुलीच्या आयुष्यापुढे त्या गोफाची काय किंमत म्हणून बापू तो गोफही त्यांना देतो. एवढे देवूनही हुंड्याचा लोभ कमी होत नाही आणि ते त्या मुलीची अवहेलना करतात.

याच घटनेची पुनरावृत्ती तिच्या ननंदेच्या लग्नात घडते. आपल्या वडिलांनी दिलेला सोन्याचा गोफ ती ननंदेच्या आयुष्याचा विचार करुन तो गोफ देवून टाकते. यामागे हुंड्यासाठी झालेली दोन्ही कुटुंबाची अवस्था या कथेमध्ये टिपली आहे. या सामाजिक प्रश्नाचे स्वरुप दाखवित असताना हुंड्यासाठी मुलीच्या आयुष्याची झालेली अवस्था चित्रित करुन एकूणाच समाजातील हुंडा या अनिष्ट प्रथेवर प्रतिमा इंगोले यांनी अचूक बोट ठेवलेले आहे. हुंड्याच्या अवास्तव मागणीमुळे ग्रामीण भागातील स्त्रियांना भोगावी लागणारी दुःखे काही कथांतून प्रतिमा इंगोले यांनी अचुक टिपलेली आहेत. हुंड्यापायी वाट्याला आलेली दुःखे ग्रामीण भागातील स्त्री कशी निमुटपणे सोसते याचे प्रभावी चित्रण इंगोले यांनी जसे केलेले आहे त्याप्रमाणे ग्रामीण भागातील या पारंपारिक हुंडापध्दतीला, रितीरिवाजाला विरोध करणाऱ्या काही स्त्रियांचे चित्रणही प्रतिमा इंगोले यांनी आपल्या काही कथांतून करतात. त्यामध्ये "सपन" (लेक भुईची) या कथेत पारंपारिक हुंडा पध्दतीला जरा फाटा देवून ही स्त्री पुढे आलेली आहे. ग्रामीण भागातील मुली विषयी समजुती वेगळ्या असतात. तिने जास्त शिक्षण घेऊ नये, जास्त शिक्षण घेतलेल्या मुली बिघडतात, त्यांची लवकर लग्न होत नाहीत असाच सर्वांचा ग्रह असतो. तसाच या कथेत विमलविषयी आहे. दहावीपर्यंत शिक्षण घेतलेली विमल आहे. त्यामुळे पुढचे शिक्षण बंद करुन तिचे लवकरात लवकर लग्न ठरविले जाते.

ठरल्याप्रमाणे हुंडा दिला जातो. तत्पुर्वी विजय हा त्यांच्या पाहुण्यातील मुलगा परंतु तो डॉक्टर झालेला आहे. त्यामुळे त्याच्या शिक्षणाला झालेला खर्च हुंड्याच्या रुपाने मिळावा ही विजयच्या घरच्यामंडळीची अपेक्षा असते ती अपेक्षा विमलच्या घरच्या मंडळीकडून पूर्ण होत नाही. म्हणूनच विमलचे लग्न दुस-या मुलाबरोबर ठरविलेले असते. आणि हा मुलगा लग्नावेळी सोन्याची चेन व आंगठी मागतो. त्यामुळे विमलच्या वडीलांची अवस्था बिकट होते.

"इमीची माय ! तुमा गयातले ते सोन्याची साकयी दे ! नवरदेव म्हणते का मले गोफ आन आंगठी पायजे. त्याशिवाय मी राशी निंगत नायी आन लगनाले उबा रायत नाही. म्या कसबस समजोलं पाया पडलो. म्हनल लागन त गोफ आरताच आनतो पन असं करु नका. हयदीले बट्टा लावू नको. मुंदी एकापरी हंगामावर दीन." [५]

नव-याच्या या अवास्तव मागणीला विमल विरोध करते आणि ती हे लग्न आपण करणार नाही असा धाडसी निर्णय घेते आणि त्याचवेळी ती विजयबरोबर लग्नाला तयार होते. काहीही हुंडा न देता. विमलच्या लग्न न करण्याच्या निर्णयावेळी ग्रामीण भागातील आयाबाया म्हणत होत्या, "अई माय ! कसी व नवरी ? असी कसी म्हणते ? पिसं लागलं की काय तिले ? माय! माय म्हणते लगन नायी करतं. काय तसीच सन्टी रायते काय व हे ! बियाईच्या दोडक्यावानी येच्यासाठी पोरीले शिकू नायी. त्या मगा तोंड फुटले आन त्या भादर भादरे करतेय. मोठ्या मानताईच्या मामल्यात दिन बोलावं काऊन ?" [६]

यावरुन ग्रामीण मुलीला शिक्षणापासून दूर ठेवण्याचा उद्देश दिसून

येतो. परंतु शिक्षणामुळे ग्रामीण भागात स्त्री जागरूक होत आहे याचे प्रतिक म्हणून या कथेतील विमलची कामगिरी महत्वाची वाटते. हुंडयासाठी रुसणा-या नव-याबरोबर ती लग्न करण्यास विरोध करते हाच विरोध ग्रामीण जीवनात हुंडयाच्या वाढत्या प्रमाणाला काही अंशी आळा घालेल असा एक आशावाद दिसून येतो.

विधवा स्त्रियांची दु:खे :

ग्रामीण भागातील विधवा स्त्रियांची अवस्था आणि त्यांच्या जीवनात त्यांना भोगाव्या लागणा-या व्यथा वेदना याचे चित्रण झोले यांनी आपल्या काही कथांतून केलेले आहे. अशा काही कथांचा येथे विचार करता येईल. "वटी" (लेक मुईची) या कथेत नव-याच्या मृत्यूनंतर विधवा पुंजी मंगणीला सोसाव्या लागणा-या यातना अनेक प्रकारच्या आहेत. नव-याच्या मृत्यूने तिला आणि तिच्या मुलांना उदरनिर्वाहाचे काहीही साधन नसल्याने उदरनिर्वाहासाठी भोगाव्या लागणा-या वेदना आणि यातच तिच्या एकाकीपणाचा फायदा घेणारे समाजातील घटक यांच्याशी तिला झगडावे लागते. दारिद्रयाने तिची झालेली अवस्था, गावात फिरताना येणारे अनुभव यामुळे ती आजींचा वाडा पसंद करते. अनेक बाजूनी स्थैर्य असलेल्या या आजीच्या वाडयात ती राहत असते आणि उरलेसुरले खाऊन मुलानाही खावू घालते. यामुळे ती आजीबाईच्या इथे ब-यापैकी सुखी असते या तिच्या सुखी जीवनाला शहरी जाण्याच्या प्रसंगाने धक्का लागतो आणि पुन्हा त्या शहरी जीवनात अर्धवट पोटी काम करणे आणि अनेक बंधने यामुळे ती शहरीपणाला कंटाळून ती पुन्हा आजीकडे येते. आजीने तिला शहरी पाठविल्यामुळे आजीकडे कामास दुसरी मोलीन

असते. याचाच परिणाम तिच्या जीवनावर होतो आणि पुन्हा तिला गावभर फिरण्याचे आणि पहिल्या सारखेच दु:ख वाटयाला येणार होते. तत्पूर्वी ती आजीकडे आपल्या वटीची भीक मागते "वटी" मधल्या पुंजीचं वैधव्य आणि त्यामुळे तिला भोगाव्या लागणा-या दु:खाचे चित्रण इंगोले यांनी सुक्ष्मपणे केलेले आहे. या कथेतील एकूणाच चित्रणाविषयी अंजली सोमण म्हणातात, "वटीची भीक मागणा-या पुंजी मागणीचे दु:ख या कथेत कलात्मक रूप घेते आणि विलक्षण परिणामकारक ठरते." [१] अंजली सोमण यांचे मत कथेतील कथानकाशी आणि पुंजीच्या समरस होणारे असे आहे. पुंजीला भोगावे लागणारे दु:खाचे अनेक पदर आहेत. अगतिक, विधवा म्हणून आणि दारिद्रय यामुळे भोगावे लागणारे दु:ख आणि समाजाकडून तिची होणारी फसवणूक हेही तिच्या दु:खाचे कारण कसे ठरले हे या कथेत प्रत्ययकारीपणे दाखवून दिलेले आहे.

"सर्व" याही कथेत विधवेच्या दु:खाचे चित्रण केलेले आहे. नथीचे वडिल सैन्यात असतात आणि त्यांचे युध्दात आलेले मरण यामुळे नथीच्या आईच्या आयुष्यात दु:ख निर्माण होते. आपल्या पश्चात आपल्या बायका मुलांचे भविष्य उज्वल व्हावे म्हणून त्यांनी काही पैसे तिला मिळतात आणि या पैशामुळे आपण व आपली मुलगी यांच्या आयुष्यात काहीही कमी पडणार नाही अशा समजुतीने असलेली नथीची आईचे दु:खाची सुरवात होते ती तिच्या दिराने फसविल्यामुळे. विधवा स्त्रीला कुटूंबातील व्यक्ती कशा फसवितात आणि त्यांना एकाकी पाडतात याचे चित्रण या कथेमध्ये केलेले आहे.

मृत नव-याच्या पश्चात झालेल्या फसवणुकीमुळे तिला सोसावे लागलेले दु:ख हे तिहेरी स्वरूपाचे आहे. आपल्या अडाणीपणामुळे

आपण फसलो गेलो त्यामुळे हे वाटयाला दु:ख आले याची जाणीव तिला असते आणि या जाणिवेतूनच ती आपल्या मुलीच्याशिक्षणासाठी कष्ट घेत हाल सोसत असते. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा विरुध्द ती लढू शकत नाही. कोणाकडे तक्रार करीत नाही. जे विधवेचे दु:ख मिळाले आहे ते नियतीने मिळालेले आहे आणि ते निमुटपणे सोसले पाहिजे असाच त्या ग्रामीण विधवा स्त्रियांचा जगण्याचा कल दिसतो. या कथेतील विधवा स्त्रीच्या दु:खाचा वेध घेताना इंगोले यांनी विधवेच्या जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण केलेले आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण विधवा स्त्रियांच्या जीवनाचे सखोल आकलन आणि व्यापक जीवनदृष्टी असल्याचे दिसून येते.

स्त्री वरील अन्याय/अत्याचाराचे चित्रण करणा-या कथा :

ग्रामीण भागातील स्त्रियांना एकत्र कुटुंब पध्दती, समाजातील अनिष्ट प्रथा, हुंडा यामुळे जसे दु:ख भोगावे लागते त्याचप्रमाणे गावातील धनदांडगी माणसे गरीबांच्या मुलीबरोबर आणि स्त्रियांच्यावर कसा त्यांच्या असहाय्य परिस्थितीचा फायदा घेऊन अशा गरीब स्त्रियांच्यावर अन्याय अत्याचार करतात याचेही चित्रण काही कथांतून येते. "बळी" या कथेत ग्रामीण भागातील श्रीमंत मंडळी आपल्या सुखासाठी गरीब नथीचा बळी कसा घेतात हे या कथेत चित्रित केलेले आहे. बापू पाटील गावातील सधन शेतकरी आणि गावचा पाटील. यामुळे गावात त्याचा वचक भारी असतो आणि त्याविरुध्द कोणीही काही बोलत नाही. अशा ग्रामीण भागातील श्रीमंत व्यक्तीच्या घरी गरीब घराण्यातील त्यांच्यातच शेतावर शेतमजुरी करणा-या गावातील

मजुर व घरगडी यांच्या मुलीचा कसा बळी घेतात हे दाखविले आहे.

रामा हा बापू पाटलाच्या इथे कामाला असतो. पाटलाच्या घरी पाहुणे आलेले असतात. त्या पाहुण्याने रामाच्या मुलीला पाहिलेले असते आणि ती मुलगी त्यांना पाहिजे असते. त्यासाठी बापू पाटील रामाच्या मुलीला नथीला वाड्यावर पाठविण्यास सांगतो. परंतु रामा त्याला तयार नसतो. रामाला धमकी देवून सांगतो की, "हे पाय राम्या ! मी तुझ्या भल्यासाठीच सांगतो. तू मुकाट्याने नथीले माया वाड्यावर आजच्या रोज घालून दे. अरे तुले फाशी झाली तर फालतू तुइ हकनाक मरसीन आन तू मेल्यावर तूझ रंडकी बायको आन् नयतुरनी पोरगी सुदी रायीन व्हय ? वावर आन् घर जप्तीपायी जाईन ते वालच." [१०]

बापू पाटलाच्या या धमकीमुळे नथीचा बाप नथीला पाटलाच्या वाड्यावर पाठवितो आणि तिचा पाटील बळी घेतो. या प्रसंगाने नथीच्या आईची झालेली अवस्था आणिरामाची झालेली मानसिक अवस्था अचूक टिपली आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याचा असहाय्यतेचा फायदा घेऊन स्त्रियांचे कसे बळी घेतले जातात, त्याची ही प्रतिनिधीक कथा आहे. अशा बळी जाणाऱ्या स्त्रियांच्या प्रमाणात सध्या वाढच होताना दिसते. स्त्रियांच्या बळी जाण्याविषयी प्रश्न उपस्थितीत केला आहे.

"लेक मुईची" ही कथा ऐतिहासिक स्वरूपाची आहे. बहामनी काळातील स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे या कथेत चित्रण केलेले आहे. स्त्रियांवरील होणाऱ्या अन्यायाविरुध्द शिवाजी महाराजांनी कसा

लढा दिला आहे याचे चित्रण केलेले आहे. सद्य:परिस्थितीत होणाऱ्या स्त्रियांवरील अन्याय दुर कोण करील ? असाच प्रश्न या कथेतून उपस्थितीत केलेला आहे. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या मनोगतात या कथेविषयी मत मांडताना म्हटले आहे की, "जित्या जागत्या जिवांचा झालेला खराबा आपणास दिसतो आहे. अशावेळी "लेक भुईची" जास्तच नागवली जाते. गरिबीमुळे येणारी असहाय्यता तिला भोवते आणि तिच्या अस्मितेला, प्रतिष्ठेला, सन्मानाला नख लावते."[११] ग्रामीण जीवनातही स्त्रीवरील अत्याचार होताना दिसतात. आणि अशा या अन्यायाला सामोरे कोण जाणार ? हेही तितकेच खरे आहे. तिला कोण वाचवणार ? हेही महत्वाचे आहे.

"बि-हाड" (झुगनचा खोपा) या कथेत पंचफुलांच्या निवाऱ्यासाठी सततची चाललेली धडपड आणि सोसाव्या लागणाऱ्या यातना याचे चित्रण केले आहे.

निवाऱ्याच्या शोधात फिरणाऱ्या पंचफुला व तिचा नवरा यांच्या ससेहोलपटीचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे. एखाद्या बांधकाम चाललेल्या ठिकाणी आपलं बि-हाड मांडत असताना त्यांची झालेली अवस्था बि-हाड मांडून झाले न झाले तोच त्या जागेवरून तो मालक हाकलून देत असतो. शेवटी ती सोसायटीत एक छप्पर मारून राहतात. त्यासाठी सोसायटीचे काम करावे लागते. आपल्या सोसायटी राहतात म्हणून सर्वजन त्यांना कामे सांगतात आणि काम ऐकत नाही म्हणून जाण्यास सांगतात.

डॉक्टरच्या शेजारीच पंचफुला आपल्या घराची स्वप्न पाहत होती. आणि पाडव्याच्या मुहुर्तावर भावी घरासमोर आनंदाची

गुढीही उभारली होती. परंतु तिचे सुख पाहवले नाही. डॉक्टरीण बाईंनी सरळ सरळ डबा चोरीचा आरोप तिच्यावर घातला आणि या चोरीच्या आरोपामुळे तिला जीवनात सर्व काही गमावल्याची जाणिव झाली.

आपणाच ठेवलेला डबा त्यांना सापडतो परंतु बिचा-या गरीब पंचफुलावर घेतलेला चोरीचा आरोप होत नाही. जेव्हा डॉक्टरीण-बाई तिच्यावर आळ घेते तेव्हा प्रत्येक घर सोडताना ती जितकी कासावीस होत नाही तितकी कासावीस या आळाने होते. नागरी माणसांत पांढरपेशा व्यक्तीत असणारे व्यावहारिक शहाणपणा तिच्याजवळ नाही. ती क्षणात तेथला तुनुमुनु असणारा निवारा सोडून देते. तिचा हा निर्णय चोरीच्या आरोपाने घायाळ झालेले तिचे मन, एका प्रापंचिक खेडूत श्रमजीवी स्त्रीच्या मनाचे चित्रण या कथेत येते.

अंधश्रध्दा व परंपरा यामुळे भोगावे लागणारे दुःख :

ग्रामीण जीवनात अंधश्रध्दा, रुढी, प्रतिष्ठेच्या कल्पनाही दारिद्र्याबरोबरच येतात. समाजव्यवस्थेमध्ये देव, धर्म, रूढी, परंपरा संकेत इ. कल्पनामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या विशेषत: स्त्रियांच्या जीवनात दुःख कसे निर्माण होते याचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी आपल्या काही कथातून केलेले आहे. "दारका" (अकसिदीचे दाने) या कथेत अंध्दश्रध्देमुळे दुःख कसे निर्माण होते हे दाखविले आहे. नंदी-बैलाच्या जन्मावेळी तो व्यवस्थित जावा म्हणून जे नवस बोलले जाते त्या नवसामुळे नंदी वाचला म्हणून ते नवस फेडण्यासाठी दरवर्षी त्यांची दारका काढली पाहिजे. हा अंधश्रध्देचा भाग या कथेत आला आहे.

दारिद्री परिस्थितीत स्वत:ला एकवेळ खायला नसले तरी चालेल परंतु ते नवस तेवढयाच श्रध्देने पुर्ण केले जाते. नवस करणा-या मालकिणीच्या मृत्यूनंतर तिची इच्छा तृप्त व्हावी म्हणून नवस फेडण्यास सांगते. परंतु शांक-याने, पैसे दिलेले दारू खातलेले असतात. त्यामुळे बैलाची "दारका" काढली जात नाही. त्यामुळे नंदीचा मृत्यू झाला अशी सर्वांची समज होते. यामुळे चुलतीला दु:ख होते. माल्कीणीची इच्छा आपण पुर्ण करू शकलो नाही याची तिला जाणिव होते. त्यामुळे चुलतीला जे दु:ख होते त्याचे अचुक चित्रण केले आहे. "चुलती एकाएकी दुष्काळा दाटून आला मानूस गेल्यावानीच ते रडाले लागली मिंले वाटल आपूनच कमी पडलो. बाबीले कबूल केलं व्हतं..."[१२] यातून आपण दिलेला शब्द पाळला नाही आणि बैलाच्या मृत्युला आपणाच कारणीभूत ठरलो या अंधश्रध्देमुळे दु:ख कसे वाटयाला येते हे झोले यांनी या कथेमध्ये मांडले आहे.

"मोड" या कथेत ग्रामीण भागात "वंशाला दिवा म्हणजे मुलगा" अशी एक रूढ आहे, समज आहे. या रूढीपोटी स्त्रीच्या वाटयाला दु:ख कसे येते आणि तिचा मानसिक कोंडमारा कसा होतो याचे चित्रण येते. वंशाला दिवा पाहिजे म्हणून मुलगा हवाच असतो. घराण्यात मुलगा हवा आणियासाठीच ग्रामीण भागातही मुलींची अवहेलना होते. त्याच प्रमाणे स्वत:च्या दारिद्रयाची मुलांच्या पालनपोषणाची जाणिव नसलेल्या अशा कुटूंबातही जरी पाच मुली झाल्या तरीही मुलगा पाहिजे यासाठी नवस बोलणा-या स्त्रीची ही प्रतिनिधीक कथा आहे. गोकुळीला पाच मुली असतात आणि मुलगा होण्यासाठी तिने अनेक दिवस देवाची पुजा, नवस, उपास तापास करून तिला मुलगा होतो. देवाच्या कृपेने झाला म्हणून त्याचे नाव नागो

ठेवते. घरच्या दारिद्र्यामुळे नवरा-बायकोला दुसऱ्याच्या शेतावर कामाला जावे लागते तरीही पोटभर अन्न मिळेल याची शाश्वती नाही. त्यात खाणारी तोंड जास्त अशी या कुटुंबाची अवस्था आहे.

या कथेत दुसऱ्याच्या शेतावर मजुरीला जाण्याशिवाय पर्याय नसल्यामुळे नागोला दुर्गीकडे ठेवून जाते. दुर्गीचं खेळाचं वय असल्याने ती खेळात गुंग असते त्यामुळे तिचे नागोकडे दुर्लक्ष होते. नागो खेळत खेळत असतानाच पडक्या माडीवरून खाली दगडावर पडतो आणि डोके पांढरे करतो. नागोच्या अपघाताने त्या कुटुंबाची झालेली अवस्था त्यापेक्षाही गोकुळीची झालेली अवस्था इंगोले यांनी सूक्ष्मपणे रेखाटली आहे. गोकुळीला नागोच्या अपघाताने सर्वकाही आठवू लागते. आपण आज कामावर गेलो नसतो तर तालुक्याच्या डॉक्टरांनी नागोकडे लक्ष दिले असते तर, अशा अनेक विचारांनी तिला फिट (भोंड) येतात. या गोकुळीच्या दुःखाचे चित्रण मुलागा होण्यासाठी तिने भोगलेल्या यातना, उपास तिला सर्वकाही आठवू लागते. त्याचबरोबर आपली दारिद्री परिस्थितीही या घटनेला कारणीभूत कशी आहे हेही तिला आठवू लागते. आपल्या मुलाच्यामृत्युला कारणीभूत असल्याचे कारण ती दुर्गीवर ठेवते. आणि मनातील सगळा राग काढून दुर्गीला उठसुठ बेदम मारते. तिच्या या मन:स्थितीमुळे सगळ्या घराला भोंड (चक्कर) येते. दुर्गीच्या वडिलांनी केलेले भाष्य म्हणजे त्यांच्या दुःखाचे वास्तव चित्रण आहे. त्या दुःखाला इतर कोणीही जबाबदार नसून जबाबदार आहे ती आपली परिस्थिती. आणि या सामाजिक रूढीमुळे व घरच्या दारिद्र्यामुळे हे सर्व भोगण्याची वेळ गोकुळीवर येते. या कथेविषयी अंजली सोमन म्हणतात, "स्त्रीचे दुःख हे भोंड या कथेचे

केंद्र असूनही इंगोले स्वत:ला स्त्रीवादी दृष्टिकोनातून बांधून घेत नाहीत. उलट व्यापक समाजव्यवस्थेशी विशेषत: ग्रामीण जीवनाशी स्त्रीच्या दु:खाचे असलेले नाते त्या शोधतात." [११]

पाच मुलींच्या पाठीवर मुलगा झालेला असतो. वास्तविक एका माणसाला जगणे जिथे अशक्य आहे अशा दारिद्री कुटुंबातही पाच मुलीनंतर मुलगाच हवा हा समाजरूढ झालेला समज किती खोलवर उमटलेला आहे. याची जाणिव लेखिका करून देते.

"दिठ" (लेक सुर्खीची) या कथेत ग्रामीण भागात आजही अंध:श्रध्दा नवससायास या अनिष्ट प्रथा कशा जोपासल्या जातात आणियाच प्रथा ग्रामीण माणसाच्या दु:खाला कशा कारणीभूत ठरतात ते या कथेत दाखविले आहे. या कथेत शहरातील सुशिक्षित स्त्री खेडयात राहावयास येते. आपण इतर ग्रामीण स्त्रीयापेक्षा सुधारलेल्या आहोत हे प्रत्येकवेळी सांगण्याचा प्रयत्न ती करीत असते. परंतु शेजारणीच्या मुलाच्या मृत्युने तिच्यातील अवगुन दिसून येतात. तिच्या दु:खात तिने सहभागी होणे हे दुरच राहीले परंतू तिची दृष्ट आपल्या मुलाला लागेल या अंधश्रध्देपोटी घरातून बाहेर पडत नाही. स्वत:च्या मुलाच्या मृत्यूपेक्षा तिने दिलेले दु:ख शेजारणीला जास्त गहरेपणाचे वाटते. ग्रामीण स्त्रिच्या दु:खात आपल्या दु:खाची भर घालणारी ही स्त्री आहे. इंगोले यांनी या कथेच्या रूपाने हे दृष्ट गुण स्त्रिच्या दु:खाला कसे कारणीभूत ठरतात हे दाखविले आहे. शिक्षणामुळे माणसाला माणूसकी जपावी अशी अपेक्षा असते. परंतु समाजजीवनातील रूढी, श्रध्दा तग धरून आहेत हे या स्त्रिच्या रुपाने दिसते. स्त्रिच्या दु:खाला जसे पुरुष जबाबदार असतात त्यापेक्षाही स्त्रिच्या दु:खाला स्त्रीच कशी जबाबदार असते हे या कथेत दाखवून दिलेले आहे. या कथेतून इंगोले यांच्या सामाजिक दृष्टिकोन

आणि एक लेखिका म्हणून तटस्थपणे लिहिलेली ही कथा खरोखरच त्यांच्या कथागुणाबरोबरच त्यांच्यातील माणूसकीचा आदर करणारी ठरते.

<u>ग्रामीण व्यक्ती आणि समाज यांच्या परस्पर संवादाचे आणि विसंवादाचे चित्रण करणाऱ्या कथा :</u>

प्रतिमा इंगोले यांनी स्त्री जीवनाच्या चित्रणाबरोबरच ग्रामीण समाज जीवन आणि ग्रामीण व्यक्तीचे जीवन चित्रण केलेले आहे. त्यातील परस्पर संवादाचे आणि विसंवादाचेही चित्रण काही कथांतून केलेले आहे.

"अकसिदीचे दाने" (अकसिदीचे दाने) या कथेत ग्रामीण समाज जीवनाचे चित्रण केलेले आहे. गावातील सरपंचाच्या निवडणूकीच्या प्रसंगातून गावातील जीवन समजून येते. पुंडलीक पाटील सरपंच होतो आणि पिढयान पिढया सरपंचकी असलेल्या मोरेला धक्का बसतो आणि पुंडलिक पाटलाविरुध्द अनेक कारवाया करतो आणि त्याला व्यवस्थित कायद्याच्या कचाटयात अडकवितो. एवढे होऊनही वेळीच पुंडलीक पाटील त्यांच्या प्रसंगाला धावून येतो यावरुन ग्रामीण समाज जीवनाचा अजुनही काही प्रमाणात माणूसकी जोपासली जात आहे. याचे उत्तम उदाहरण आहे. त्याचबरोबर गावातील राजकारणाने ग्राम जीवन कसे बदलते आणि स्वतःच्या स्वार्थापोटी अस्पृश्य हाताशी धरुन कसे राजकारण खेळले जाते याचा उत्तम नमुना या कथेच्या रुपाने पाहता येतो. विदर्भातीलच काय आज संपूर्ण भारतीय ग्रामीण भागात या राजकारणामुळे समाज जीवन कसे ढवळून निघाले आहे. या कथेच्या रुपाने गावातील राजकारणी लोकांचा आणि समाज यांच्यातील बारकावे अचूक टिपले आहे.

ग्रामीण समाजात जसे माणुसकी जपणारे लोक असतात त्याच प्रमाणे दुस-याला दुःख देण्यात काही मंडळी धन्य वाटते. अशाही लोकामुळे समाज जीवनावर होणारा परिणाम आहे. "इनवासे" (झुरनचा खोपा) या कथेत चित्रित केलेला आहे. दुस-याला सुखी पाहण्यात काही लोक समाधानी असतात तर "काही दुस-याला दुःखी देण्यात समाधान याच प्रवृत्तीचा समाज जीवनात अधिक भरना असतो. या कथेत गणेशाच लग्न जमलेलं असते. गणेशाही प्राध्यापक असतो आणि त्याला मुलगीही चांगली बरोबरीची मिळते. त्यामुळे आनंदी आनंद झालेला असतो. हा आनंद काही लोकांना बघवत नाही आणि ते मग निनावी पत्र पाठवून मुलीची बदनामी करतात. तात्पर्य एवढाच असतो की, लग्न मोडावं आणि तसे घडणारही असते. परंतु गणेशाच्या चुलत्यामुळे हा प्रसंग टळतो. आणि त्याची जीवनपध्दती पाहिली की थक्क व्हावे असेच आहे. समाज जीवनात अशा लोकांचा अभाव असतो ग्रामीण भागातील या प्रवृत्तीवर योग्य प्रसंगाच्या आधारे त्यांनी लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

"गढी" (कसिदीचे दाने) या कथेत ग्रामीण समाजाच्या विकासासाठी झटणारे बापू गुरूजी आणि त्याच्या कार्यात अडथळे निर्माण करणारे गावातील काही लोक यांचे चित्रण येते. विकास कामात अडथळे सांगणारे आणि एकंदर सामाजाची प्रगती नको असलेल्या या लोकांचेही इंगोले यांनी मार्मिक चित्रण करून समाज जीवनातील व्यक्ती-मधील समाजविघातक प्रवृत्तीचा येथे वेध घेतला आहे. बापू गुरूजींनी एखादे विकास काम हाती घेतले की, त्याच्या अपप्रचार करून समाजाला दिशाहीन करण्याचे कार्य ही मंडळी करतात. पर्यायाने समाज-जीवनाच्या विकासाच्या आड येणा-या प्रवृत्तीवर कोणतीही प्रति-क्रिया व्यक्त न करता ग्रामीण समाजजीवनाचे वास्तव दर्शन इंगोलेंनी

या कथेमध्ये घडविले आहे.

"पांग फिटला" (अकसिदीचे दाने) या कथेत शेतात घाम गाळणा-या शेतक-याच्या वाटयाला शेवटी काहीच मिळत नाही. वर्षभर राबून कापूस पिकविला जातो आणि तो पिकला की गावातील चोर तो कापूस चोरून नेतात. या घटनेसाठी गावातील सर्व शेतकरी एकत्र होतात आणि त्यावर उपाय योजतात. ग्रामीण भागातील ही घडलेली परिवर्तनवादी घटना खरोखरच कौतुकास्पद आहे. या घटनेच्या प्रसंगानुसार ग्रामीण समाजाची जीवनासाठी झगडण्याची संघटित वृत्ती दिसून येते. त्याचबरोबर चोरी करणा-यालाही विचार करण्याची वेळ येते. प्रतिमा इंगोले यांनी प्रत्यक्ष ग्रामीण जीवन अनुभवलेले असल्यामुळे ग्रामीण जीवनातील बारीकसारीक घटना अचूक आणि प्रत्ययकारीतेने टिपल्या आहेत.

"पेरणारे हात", (गुारनवा खोपा) या कथेत पेरणारे हातांना न्याय मिळत नाही आणि त्यासाठी कोर्टाच्या चकरा कशा माराव्या लागतात आणि एवढे करूनही न्याय मिळेलच असे नाही. त्यामुळे कष्ट करणा-यांची फसवणूक, पिळवणूक कशी केली जाते आणि कष्ट करणा-या हाताना इथली न्यायव्यवस्थाही कशी घातक ठरते अशा गुंतागुंतीची मांडणी या कथेत केलेली आहे.

या कथेतील नायक गुणावंत आबाजी हा ग्रामीण संस्कृतीचं मूर्तिमंत प्रतीक आहे. त्याच्यादृष्टीने पेशापेक्षा माणुसकी श्रेष्ठ आहे. या माणुसकीचे, जिव्हाळ्याचे मोजमाप कोणत्याही साधनाने करता येत नाही असा त्याचा विश्वास आहे. त्याने आपुलकीने आपल्या धर्माच्या लेकीला आणून दिलेले कांदे घेताना, शहरात राहणा-या वकिलनबाईच्या मनात विचार येतो. आजकाल हे देणे-घेणेही दुर्मिळ झालयं. कुठल्याही

गोष्टीचा पैसा करायचा आणि कुठलीही गोष्ट पैशात मोजायची आणि पैसे फेकून मिळवायची. यामुळे असल्या भावनेची कदर केली जात नाही." हा ग्रामनागर विकार या कथेतून लेखिकेने आपल्या सक्षम लेखणीचे समर्थपणे मांडला आहे. पुढे आपल्या धर्माच्या लेकी-जवळ बोलता बोलता हा म्हातारा आपल्या खाक जावयाचे दुःखही बोलून दाखवितो. समजून उमजून आपल्या लेकीसाठी हे सारे सहन करावे लागते असे तो म्हणतो, "हा धनमोठा असला तरी आपल्या पोटाच्या गोयासाठी मढ मना लागते" या व-हाडी म्हणीत आपली खंत, आपला विचार व्यक्त करतो. सासुरवाशीण लेकीकडे बघण्याचा व-हाडी स्वभावविशेष लेखिकेने नेमकेपणाने त्यातून स्पष्ट केलेला आहे.

शहरी वैभवाला भुलेले ग्रामीण जीवन याचे चित्रण "पयस्याची मेख" (लेक मुईची) या कथेत संपत शिंप्याच्या मुलीचं लग्न मुंबई शहरातील एका श्रीमंत माणसाबरोबर ठरलेले असते. वयाने दुप्पट असलेला संपतचा जावई कसा दिसतो म्हणून ग्रामीण लोकांची झुंबड उडते. जोतो त्याच्या वैभवाची प्रसंशा करतो. संपत्या भाग्यवान आहे. श्रीमंत जावई मिळाला असे प्रत्येकजण म्हणतो. परंतु या श्रीमंत माणसा-च्या ख-या माणुसकीची कोणीही चौकशी करीत नाहीत की संपत शिंप्याच्या बायकोची आणि मुलीची झालेली अवस्था कोणीही लक्षात घेत नाहीत.

शहरी वैभवाला दिमाखाला सारे गाव पाहत असते. परंतु आपल्या दारिद्र्य जीवनाची कुणालाही जाणीव होत नाही, की गावातील एका चांगली मुलीच्या जीवनाची वाताहात होणार असते याचे कुणालाही काही वाटत नाही. ग्रामीण समाज शहरी वैभवाला भुलला आहे आणि आपल्या सत्वाची जाणीव त्याला होत नाही.

एकंदर बदलते ग्रामीण जीवनाचे हे चित्र सर्वच ठिकाणी प्रत्यक्ष पाहावयास मिळते.

ग्रामीण तरूण मनाचे चित्रण :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात दुस-या दशकात ग्रामीण भागातील तरूणांना शिक्षणाची संधी प्राप्त झाली. यातून ब-याच प्रमाणात तरूण पिढी शिकून तयार झाली. परंतु काही प्रमाणात शिक्षण घेतलेले तरूण शहरी आकर्षणाने शहराकडे जाऊ लागला. परंतु शहरामध्ये होणारी कुचंबणा, मानसिक कोंडमारा, आणि पैशाची हाव कुटुंबात निर्माण झालेल्या वेगवेगळ्या समस्या संघर्ष इ. यामुळे अशा तरूणाचे उध्वस्त होत जाणारे भावविश्व प्रतिमा इंगोले यांनी काही कथातून चित्रित केलेले आहे.

"भोवांडा" (भुगरनचा खोपा) या कथेतील ग्रामीण तरूण दारिद्र्याला कंटाळून शहरातील वैभवाच्या लालसेने गावातून पळून शहरात जातो. त्याच्या कल्पनेतील शहर त्याला दिसत नाही. वास्तवाशी झुंज देण्यापेक्षा वेगळा मार्ग त्याच्याकडे काही नसतो. त्यामुळे तो दारिद्र्याच्या ओझ्याखाली दबला जातो. अन्नाला महाग होण्यापेक्षा शहरातील सैतानीत गुरफटतो आणि या चक्रव्यूहातून त्याला बाहेर पडणे मुश्किल होते. शालक्या हा ग्रामीण तरूण भुकेच्या लालसेने शहराकडे धाव घेतो आणि जीवाच्या लालसेने पुन्हा गावाकडे धावतो ही जी शालक्याची झालेली ससेहोलपट मनाला भिडते आज शहरामध्ये असे कितीतरी ग्रामीण तरूण दिशाहीन होऊन इतरत्र विखुरले गेले आहेत. शालक्या हा ग्रामीण तरूणांचा प्रतिनिधी ठरावा एवढे वास्तव इंगोले यांनी आपल्या कथेमध्ये रेखाटले

आहे. ग्रामीण तरूणाला असलेले शहरी जीवनाचे आकर्षन आणि ग्रामीण तरूण मनाचा झालेला कोंडमारा हा त्या शहरी जीवना-मुळे झालेला आहे आणि त्यामुळे त्याच्या जीवनाला त्याला भोगावे लागणारे दुष्परिणाम याचे प्रत्ययकारी चित्रण इंगोले यांनी या कथेमध्ये केलेले आहे. ग्रामीण तरूण कोंडमारा "चाकोळी" (अकसिदीचे दाने) या कथासंग्रहातील या कथेमध्ये केले आहे. आई-पत्नी यांच्या भांडणात कोणाची बाजू घ्यावी यासाठी त्यांच्या मनाचा झालेला कोंडमारा आणि झालेली द्विधा स्थिती इंगोले यांनी अचूक टिपली आहे.

ग्रामीण भागातील वास्तवादी चित्रण इंगोले यांनी केले आहे. सर्वच ग्रामीण जीवनात कमी अधिक जाणावणारा हा प्रसंग आहे. ग्रामीण तरूणाची ही अवस्था आहे. लग्नापूर्वी आई व मुलगा यांच्यातील माया लग्नानंतर सुन आल्यामुळे कशी कमी कमी होत जाते. क्षुल्लक प्रसंगानेही आई व मुलगा यांतील माया दुरावत जाते. नवीन आलेल्या सुनेला आई बोलते. भली त्याची चुक नसतानाही अशा स्थितीत आईला काय बोलावे हा प्रश्न निर्माण होतो. या कथेतील या ग्रामीण तरूणाचे लग्न झालेले असते. लग्नाच्या काही दिवसांनीच पत्नीला विंचु डसतो अशातही ती घरचे काम करीत असते. पत्नीची प्रेमाने विचारपूस करावी तरीही त्याला शक्य होत नाही. त्याच वेळी आईची बोलणी खावी लागतात. पत्नीला आणि आईला एकाच वेळी कोणत्या शब्दात आणि काय सांगावे हाच त्यांच्यासमोर प्रश्न पडतो. ग्रामीण जीवनातील हा प्रश्न आहे आणि ही व्यापक सामाजिक समस्या आहे. समाजव्यवस्थेमुळे ही दरी निर्माण झालेली आहे. अशा प्रकारे ग्रामीण तरूण

मनाची विचित्र अवस्था असते त्यात कोणाचीही बाजू मांडली तर दुसरीकडून गैरसमज निर्माण होतो. आणि त्यामुळे सर्वजण कसे आतल्या आत गुदमरल्या सारखे होतात ही जी सर्वांची अवस्था आहे त्यातल्या त्यात ग्रामीण तरुण मनाची वाचकाच लक्ष वेधून घेते.

"सुगरनचा खोपा" (सुगरनचा खोपा) या कथेत ग्रामीण तरुण मनाचा झालेला कोंडमारा या कथेत चित्रित केलेला आहे.

घरची दारिद्री परिस्थितीची चाहुल असूनही विवाहोत्सुक तरुणामाणसाच्या आणित्याच्या जीवन पद्दतीचा येथे आढावा घेतलेला आहे. स्वतः:चे चांगले कपडे नाहीत म्हणून दुस-याचे मागून उपरे घालतो. यातून त्यांच्या दारिद्र्याची कल्पना येते आणि अशा परिस्थितही तो लग्न करण्यास तयार असतो. त्याला आपल्या परिस्थितीची आणि भविष्यात सुधारेल याचीही अपेक्षा नसते. अशा ग्रामीण तरुणाच्या विवाहाविषयी कल्पना आणि अपेक्षा तरी कोणत्या असतात. बस्स एक मुलगी मिळाली आणि ती सुद्दा काहीही हुंडा न देता. गौतम हा या परिस्थितीने कोलमडलेला आहे. अशिक्षित गौतमाच्या मनातील कालवाकालव आणि त्याची चाललेली धडपड अचूक टिपली आहे. लग्न करण्यासाठी आतुरलेले मन ही दिसून येतेच. परंतु त्याची जीवनपद्दतीही प्रकर्षाने जाणवते.

"धुईधानी" (सुगरनचा खोपा) या कथेतील ग्रामीण तरुणाचे एकाधिकार योजनेच्या कारभारामुळे झालेली मानसिक अवस्था आणि यातून शेतक-याची होणारी परवड त्याला थांबवायची आहे. परंतु तो काहीही करु शकत नाही. यामुळे त्याचे मन अस्वस्थ झालेले आहे.

शेतीची आवड असणारा साहेबराव शिक्षणात तसा मन लावीत नव्हता. फक्त वडिलांच्या मर्जीसाठी तो नोकरी करतो. आणि शेतक-यांच्या कापसाला आपण योग्य भाव देतो. निदान त्यासाठी काम करतो यामुळे तो प्रथमत: खुष असतो परंतु त्यातील कारभाराची त्याला हळूहळू जाणीव होते आणि ग्रामीण संवेदनशील मनाला धक्का बसतो. जसजसा त्याला एकएक व्यवहार समजू लागला तसा त्याला शेतक-याच्या दु:खाचा शोध लागल्याचा आणि कारणीभूत असणा-या परिस्थितीचा शोध लागला. एकाधिकारातील आतून चाललेल्या कारभाराला जशी एक साखळीच आहे आणि या साखळीला विरोध करणे हे माझ्यासारख्या एकट्याचे काम नाही हे ही त्याला कळून चुकते. त्यामुळे शेतकरी नागवला जातो. पर्यायाने आपणच आपले मरण पाहत आहोत पण काहीही करू शकत नाही. ही जाणीव अवल्यामुळे त्याची विलक्षण कोंडी झाली आहे. ग्रामीण जीवनाचे आकलन असलेल्या तरुण मनाचे चित्रण करण्यात इंगोले यानी कोणतीही उणीव ठेवली नाही असे वाटते. एकाधिकार योजना काय आणि सहकारी क्षेत्र काय याचाच नमुना आहे. हे दाखवून दिले आहे. या वृत्तीमुळे ग्रामीण जीवन कसे आतून पोखरले जात आहे हे ही या निमित्ताने दाखविले आहे.

## ग्रामीण राजकारणाच्या प्रभावाचे चित्रण :

वर्तमान कालीन ग्रामीण जीवनात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणूकीमुळे राजकारण येते. या निवडणुकीच्या निमित्ताने गावातील सवर्ण धनदांडग्यामध्ये जी चुरस असते, स्पर्धा असते स्पर्धा असते त्याची झळ ग्रामीण जीवनातील गरीबांना व अस्पृश्यांना कशी झळ पोहचते याचे चित्रण गावस्वरूपी राजकारणामुळे खेडोपाडी आढळणारी, एकता, सामुहित भाव

कसा लोप पावतो आणि राजकारणातील हेवेदावे, जातीय वैमनस्य व तेढ कशी निर्माण होते त्याच बरोबर शासकीय अधिकारी वर्गाकडून होणारी पिळवणूक यांच्या कथा प्रतिमा इंगोले यांनी लिहिल्या आहेत. त्याचा विचार करु. "मावळती" या कथेत राजकीय परिवर्तनाने झालेला मानसिक बदल या कथेत चित्रित केलेला आहे. वडिलांचे राजकीय नेतृत्व ज्यावेळी मुलगा घेतो त्यावेळी त्या वडिलांची झालेली मानसिक अवस्था इंगोले यांनी अचूक प्रतिमासह चित्रित केलेली आहे. बाबासाहेबांनी सत्ता असताना भोगलेला मान, सन्मान आता मुलाच्या हातात सत्ता दिल्यानंतर त्याला मिळत नाही. याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम होतो. सत्कार समारंभाच्या वेळी मुलाचे सर्वांकडून कौतुक होताना पाहतो व आपल्या-कडे कोणीही पाहत नाही. आपणाला येथे स्थान नाही या जाणिवेने ते मनाने खिन्न होतात आणि सभेतून उठून निघून जातात. आपण जातो याचेही कुणाला काहीच वाटत नाही याचे त्यांना दुःख होते.

"सभेच्या ठिकाणापासून थोडे दूर येताच त्यांना नाला दिसला. उन्हाळ्यात त्या नाल्याच्या आश्रयानं हिरवळ तग धरुन होती व त्या हिरवळीवर एक मरतुकडे घोडे चरत होते." [१७]

या दृष्टयाने अचूक सुचकता प्राप्त झालेली आहे. ज्याप्रमाणे घोडयाच्या आयुष्याचे झाले तेच आपल्या आयुष्यात घडले हा विचार बाबासाहेबांच्या मनात येतो. यातून प्रतिमा इंगोले यांनी अचूक प्रतिमा दाखवून कथेचे परिणामकारकता पाठविली आहे.

"अकसिदीचे दाने" (अकसिदीचे दाने) या कथेत गावच्या राजकारणात अस्पृश्य अज्ञानी माणसांचा कसा स्वतःच्या स्वार्थासाठी

उपयोग करून घेतात हे चित्रित केले आहे.

ग्रामीण भागात गावचा सरपंच होण्यासाठी चाललेली धडपड आणि त्यातून झालेला पराभव आणि या पराभवाचा बदला घ्यावयासाठी खेळलेले राजकारण. पुंडलिक पाटील सरपंच म्हणून निवडून आला आणि याचा राग मोरे याला होता. पुंडलीक पाटील सरपंच झाला याला बदनाम कसा करायचा याच विचारात होता. त्यात त्यालायुक्ती सुचते आणि दगडया महार याला दोन चार रुपये आणि दारू दिली की तो काय सांगेल ते काम करण्यास तयार, याचा फायदा घेऊन त्याने दगडयाला दारू पाजवून व पैशाचे अमीष दाखवून पुंडलीक पाटलाने आपल्याला जातीवाचक शिवीगाळ केली आणि मारहाण केली असा पोलिसात रिपोर्ट द्यायला लावतो. त्या रिपोर्ट नुसार पोलीस पुंडलीक पाटलाला पकडण्यासाठी येतात. परंतु त्याच्या अगोदरच पाटलांनी जामीनीवर सुटका करून घेतलेली असते आणि हा डाव फसला जातो.

मागास जातीचा असलेला दगडयाच्या अज्ञानाचा फायदा कसा खेडयात राजकारणासाठी घेतला जातो याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत केले आहे. ग्रामीण भागातील अशा प्रकारचा फायदा राजकारणी करुण घेतात ही वस्तुस्थिती उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच-बरोबर राजकारणामुळे ग्रामीण जीवनात गटबाजी कशी केली जाते हेही दाखविले आहे.

ग्रामीण जीवनात गावाच्या विकासासाठी झटणारी जशी माणसे भेटतात तशी गावातील गरीब शेतक-याला फसविणारी आणि लुबाडणारी माणसेही असतात. विशेषत: जमीन जुमल्या-

बाबत कसणारा गरीब शेतकरी कसा भरडला जातो. त्याच्या मागे कोर्ट कचे-या कशा लागतात आणि या कोर्ट कचे-यापायी छोट्या छोट्या शेतक-यांचे जीवन कसे उध्वस्त होत जाते याचेही चित्रण प्रतिमा इंगोले यांनी आपल्या काही कथांतून केलेले आहे. त्याच-प्रमाणे पैसेवाले धनदांडगे गरीबांना कसा त्रास देतात अन्याय, अत्याचार करतात आणि पोलीसातही पर्यायाने अधिकारीही पैसेवाल्याच्या पाठीशी कसे उभे राहतात आणि खेड्यापाड्यातील शेतकरी शासनाच्या शासकीय योजनाखाली कसा भरडला जातो हे ही दाखविले आहे.

"पेरणारे हात" (सुगरनचा खोपा) या कथेत गुणवंतरावाने व आपल्याच गावातील शेतक-याची शेती तीनवर्षाच्या कराराने घेतली होती. तो करार तीन वर्षाचा असल्याने गुणवंतरावाने नेहमीप्रमाणे शेतात पेरणी करून पीक येईपर्यंत राबत राहिला. पीक कापताना मात्र त्याला वेगळ्याच संकटाला तोंड द्यावे लागले. करार संपण्यापूर्वी जमीन मालकाने ती शेती दुस-यास विकलेली असते आणि त्याची काहीही कल्पना गुणवंतराना नसते. आणि वास्तविक गरजही नसते. कारण त्याची तीन वर्षे अजून व्हायची होती. परंतु त्याला त्याच्या कष्टाचे फळ मिळण्यासाठी आता कोर्टाच्या चकरा मारण्यात आणि साक्षीदार गोळा करण्यात त्याची झालेली ससेहोलपट इंगोले यांनी चित्रित केलेली आहे. स्वत:च्या कष्टावर झालेला हा अन्याय आहे.

ग्रामीण जीवनात अधिकारी वर्गाकडून होणारी पिळवणूक "कोळ्लीठन्न" (लेक भुईची) कथेत बदलत्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविले आहे. त्याचबरोबर ग्रामीण समाज आणि अधिकारी वर्ग कसा बिघडत आहे याचेही दर्शन घडविले आहे.

नदीच्या पाण्यावर पीकं घेता हे आत्ता नैसर्गिक राहिलेले नाही.

आधीच बेभरवशी निसर्ग आणि त्यातच भर म्हणजे पिकांना पाणी द्यावे त्यासाठी परवानगी लागते. सरकारी अधिकारी लाचलुचपत घेतल्याशिवाय परवानगी देत नाहीत यात ससेहोलपट होती. ती सामान्य शेतक-यांची त्याला परवानगी मिळू शकत नाही. कारण अधिका-याला पैसे देवून परवानगी घेणे एवढी आर्थिक ऐपत त्याची नसते.

सरकारी अधिकारी, खेड्यातील शिक्षक, डॉक्टर, सर्वांनीच अनैतिकतेचे दर्शन घडविण्यास सुरुवात केली आहे. पैसा म्हणजे जेष्ठ त्यासाठी काहीही करायला तयार यामुळे सर्वसामान्य मानसाचं सर्वांवरुन विश्वास उडाला आहे.

"अरे ! परभ्या काहाले देवळात जात बे ! अबे ! मान साईत मानुसकी रायली नायी. नदीत पाणी रायलं नाही. पन देवळात देव रायला बे ? यी मानस आहले वाकून कोळ झाले तथी देव रायतेई बे ?" १५ (लेक भुईची)

या कथेत ग्रामीण भागाला तालुक्यातील अधिकारी वर्गाकडून मिळणारी अपमानास्पद वागणूक आणि पिळवणूक याचे चित्रण केलेले आहे.

"धुर्इधानी" (सुगरनचा खोपा) या कथेत पिक पिकविणा-या शेतक-याला कापूस एकाधिकार योजनेच्या माध्यमातून कसे नाडले जाते याचे चित्रण या कथेत आहे.

साहेबराव यांच्या मनाला पट नसताना सुध्दा तो नोकरी करता होता. कारण जिथे तो नोकरी करता होता तेथील

वातावरण त्याच्या विरोधात होते. सामान्य कापूस पिकविणा-या शेतक-याच्या घामाचे मोती न होता माती होत होती. हे तो पाहत होता. वास्तविक एकाधिकार योजना म्हणजे शेतक-यांचा विकास घडवून आणणारी योजना. परंतु साहेबरावांना या योजनेच्या माध्यमातून खाणारे आणि लुबाडणारे याचे कारस्थान दिसून लागले. कापसांना आगी का लागतात, आगीमुळे नुकसान कुणाचं आणि लोणी कोण खातो हे सर्व साहेबरावांच्या माध्यमातून दाखविण्याचे यशस्वी प्रयत्न येथे केले आहेत. वास्तवजीवनातील ही विदारक परिस्थितीचे भयाण रूप समोर ठेवले आहे.

सहकाराच्या माध्यमातून तेथील अधिका-यांच्या संगणमताने शेतक-याला लुबाडण्याचा आणि धनिकांना सहाय्य करण्याचा उद्योग ग्रामीण भागात कसा चालला जातो आणि कापूस उत्पादक शेतकरी दिवसेंदिवस कर्जबाजारी कसा होतो हेच या कथेत दाखविले आहे.

ग्रामीण जीवनातील मुक्या प्राण्यांवर प्रेम करणारी व्यक्ती "डोयाचा खेय" (लेक मुईची) कथेत गाय ही दैवत आहे हे ग्रामीण भागात मानले जाते आणि जुनी मानसं तिला किती जपतात हे या कथेत दाखविले आहे.

आबाजी वयाने म्हातारा झालेला आहे. परंतु कष्ट करण्याची पडलेली सवय यामुळे तो एस्.टी. ची वाट पाहत न बसता उन्हांच चालत गावी निघालेला असतो. वाटेत त्याला पांढरीशुभ्र गाय घेऊन उभा असलेला खाटीक दिसतो आणि खाटकाच्या हातातील गाय पाहून श्रध्दाळू मन जागृत होते. काय म्हणजे देव मानले जाते आणि हाच देव आज खाटक्याच्या हातात पाहिल्यावर त्याला राहवत नाही.

त्यामुळे तो खाटक्याला विचारतो की, गाय कितीला घेतली'.
खाटक्याला वाटत हा म्हातारा नुसती चौकशी करेल. परंतु ज्यावेळी तो गाय विकत घेण्याचे बोलतो त्यावेळी त्याची दिडसे रुपयाला घेतली अशी किंमत सांगतो. पण विकणार दोनशेला. त्यावेळी म्हातारा म्हणतो, "तुथई खरं हाय बापा ! आता तुमाले गाय दिसत नाही. तिचं मास दिसते. सकाय तुमाले मायई दिसणार नायी. तिच्याजागी बाई दिसन बाई ! जमानाच तसा बदलू रायला."[१६] यातून बदललेल्या समाजाचे चित्रण दिसूनयेते. गाय म्हणजे देवत ही भावना नष्ट झाली. राहिला फक्त व्यवहार दूध देत नाही तर पैशासाठी विकली जाते. परंतु श्रध्दा असणाऱ्या म्हाताऱ्या आबाजीला हे सहन होत नाही. शेवटी तो दोनशे रुपयाला ती गाय घेतो.

आबाजी ती गाय घेऊन जातो यातूनच अजूनही असलेली श्रध्दा दिसून येतेच, त्याचबरोबर व्यवहारी समाजही दिसून येतो.

"लंगडा" (सुगरनचा खोपा) या कथेत गावातल्या भांडणातून निरपराध मुक्या जनावराला बेदम मारुन त्याला लुळे केले. त्या मुक्या जनावराचे मनातील वेदनांचे दर्शन या कथेत घडविले आहे.

लंगडा ही कथा वाचताना आनंद यादव यांच्या "गोतावळा" कादंबरी नारबा आणि तेथील मुक्या प्राण्याचे भावविश्व ज्या पध्दतीने रेखाटले आहे त्याच प्रमाणे लंगडा या कथेत प्रतिमा इंगोले यांनी या प्राण्यांचे यातना रेखाटल्या आहेत.

मालकाचं गावातल्या दुसऱ्या माणसाशी भांडण झालं होते व त्या भांडणाचा कामासाठीच मालक गावाला गेले होते. मालक गावात

नाहीत हे पाहून त्याचे शत्रु मळयात घुसले होते. सर्व शोधूनही त्यांना काहीच सापडत नाही. शेवटी आईपासून वेगळ्या ठिकाणी घट्ट बांधून घातलेलं लहान मुकं जनावर त्यांना भेटते मालकाच्या भांडणाचा सगळा राग त्या प्राण्यावर काढला जातो आणि त्याला लुळ केलं जाते.

एकंदरच मुक्या जनावरांच्या भावनांचा विचार करून हे कथन केले आहे. एखाद्या लहान मुलांच्या वेदना आणि या मुक्या जनावरांच्या वेदना एकच असतात. त्यांना बोलून व्यक्त करता येत नाही आणि मुक्या प्राण्यांच्या वेदनांचे झोले यांनी केलेले चित्रण मनात खोलवर रुजते आणि विचार करायला लावते असेच आहे.

सारांश :

प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील आशयसूत्रांचा विचार करण्यापूर्वी लेखिकेचा परिचय व वाङ्मयीन कर्तृत्वाबरोबरच त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक सहभागाचा आढावा घेतला. त्यांच्या कथेतील जीवन-चित्रणामागील जाणिवा लक्षात घेताना लेखिकेने कथांमध्ये जे जीवन चित्रण केलेले आहे त्या जीवनाचा अनुभव घाची प्रगल्भ जाणीव त्यांना आहे. ग्रामीण जीवनातील सुक्ष्म आणि तरल निरीक्षण हेच त्यांच्या कथांचे आशय बनताना दिसतात. ग्रामीण जीवनाबरोबरच कृषी जीवनातील ज्या घडामोडी घडतात त्या घडामोडींचा परामर्श त्या अलिप्तपणे घेताना दिसतात.

प्रतिमा इंगोले यांच्या प्रत्येक कथा विषयाचे वेगळेपण जपणारी, व-हाडी लोकजीवन जपणारी संस्कृती, अस्मिता यावर प्रखर प्रकाश

टाकणारी दर्जेदार कथा आहे. लेखिकेला व-हाडी माणसाबद्दल असणारी आस्था हा त्याच्या चित्रण क्षेत्राचा मुख्य भाग दिसतो. त्याचबरोबर अन्य काही बाबीमुळे त्यांची कथा वैशिष्टयपूर्ण ठरले. लेखिकेचे लिखाणात प्रामुख्याने जाणवते ते म्हणजे लेखिकेचे ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे, परिसराचे आणि भावभावनांचे, मानवी स्वभावाचे, निसर्गाचे सुक्ष्म निरीक्षण. ग्रामीण जीवन अंतरंगाने व बहिरंगाने हळूहळू बदलत चालले असले तरी ते एक संक्रमणावस्थेतून जरी जात असले तरी त्याचे बदलणेही नागरी जीवनापेक्षा वेगळे आहे. त्यामागची कारणे भिन्न आहेत. तेथील अर्थव्यवस्था ग्रामीण माणसाचे जीवनातले परिसराचे या सर्वांचा बारकाईने विचार करुन त्या केवळ स्त्रीवादी भूमिकेतून स्त्री जीवनाचे चित्रण न करता स्त्री जीवनाचे वास्तववादी चित्रण करतात. स्त्रीच्या वाटयाला येणारीदु:खाची कारणमीमांसाही त्या करतात. स्त्रीला एकत्र कुटुंबामुळे, हुंडापध्दतीमुळे, अंधश्रध्दा परंपरा यामुळे, अन्याय अत्याचार यामुळे भागावे लागणारी दु:खे अशी दु:खाची नानाविध रुपये त्यांच्या कथांतून साकार होताना दिसतात. कारण स्त्री जीवन हा त्यांच्या चित्रणाचे आस्था केंद्र असलेले दिसून येते. तसेच ग्रामीण तरुणांचा होणारा कोंडमारा, ग्रामीण जीवनावर होणा-या राजकारणाचा परिणाम आणि मुक्या जनावरावरील प्रेम इ. विषय हाताळलेले दिसून येतात. या सा-या मिश्रणातून त्यांची कथा तयार होते. व-हाडी जीवन लेखिकेच्या व्यक्तिमत्वामध्ये एक अविभाज्य अंग असे म्हणता येईल. तात्पर्य केवळ व-हाडी भाषाच नव्हे तर व-हाडी जीवनाचीही लेखिकेला आत्मा गवसला आहे. हे त्यांच्या कथांच्या आशयावरुन जाणवते. म्हणून लेखिकेने

चित्रित केलेल्या व्यक्तींची सुख दु:खे व्यथा वेदना अंत:करण स्पर्शी झालेल्या आहेत. सत्ता पैसा या मागे धावणारा जनप्रवाह पाहून खेड्यातील माणूस कसा बावरला आहे, याची जाणिव त्यांच्या कथा आशयातून सतत प्रत्ययास येते. एकूण प्रतिमा इंगोले यांची कथा ही व-हाडमधील समकालीन ग्रामीण जीवनाचा वास्तव घेणारी कथा ठरते.

पुढील प्रकरणात प्रतिमा इंगोले यांच्या कथांचा आशय कोणत्या पद्धतीने अभिव्यक्त होतो याचा विचार केलेला आहे.

-----

## प्रकरण दुसरे

## संदर्भ


१) नागर लोकपत्र, विदर्भ, दि. १०/१/१९९३"आणि मी लेखक झाले".

२) तत्रैव, पृ.

३) झिंगोले, प्रतिमा - "लेक मुईची", (परायाची लेक), वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९९१, पृ. १५.

४) झिंगोले, प्रतिमा - "अकसिदीचे दाने", (लोकावानी), मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. ७०.

५) मुलाटे वासुदेव - ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, पृ. २३३.

६) झिंगोले, प्रतिमा - "अकसिदीचे दाने", (सोन्याचा गोफ) पृ. ४९.

७) झिंगोले, प्रतिमा - "लेक मुईची", (सपन), पृ. ६०

८) तत्रैव, - पृ. ६२.

९) सोमण अंजली - मराठी कथेची स्थिती गती, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९९५, पृ.१९५.

१०) झगोले, प्रतिमा - "अकसिदीचे दाने" (बळी), मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. ७५.

११) झगोले, प्रतिमा - "लेक मुईची" वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९९१, पृ.५ (प्रस्तावना - मनोगत)

१२) इंगोले, प्रतिमा - अकसिदीचे दाने, (दारका), पृ. २४.

१३) सोमण अंजली - मराठी कथेची स्थितीगती, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९९५, पृ. १८७.

१४) इंगोले, प्रतिमा - "झुारनचा खोपा", (मावळती), साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जुले, १९८९, पृ.७२.

१५) तत्रैव पृ ७६

१६) तत्रैव पृ ८६